# ISHWARI MALI BAGS THE BRONZE MEDAL!

Ishwari Mali, a student of Class VI, Beige won the Bronze medal in the under 13 age group category in the 16th National Ice Skating Competition.

The competition was held at Gurugram, Haryana wherein many students from Pune had participated and Pune participants bagged a total of 15 awards.



## महाराष्ट्र संघाला घवघवीत यश

**राष्ट्रीय आईस स्केटिंग स्पर्धा**

**पुणे : प्रतिनिधी**

सोळाव्या राष्ट्रीय आईस स्केटिंग स्पर्धेत पुण्याच्या मुला-मुलींनी जोरदार कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्पर्धेत एकूण १४ पदके पुण्यातील स्पर्धकांनी पटकावून महाराष्ट्राला घवघवीत यश मिळवून दिले.

हरियाणा येथील गुरुग्राम येथे ही स्पर्धा पार पडली. दहा वर्षांखालील गटात आरव पटवर्धन (सुवर्ण), ओजस कुलकर्णी (रौप्य), अद्वय कोठारी (कांस्य), तर मुलींमध्ये स्वरूपा कड-देशमुख (सुवर्ण), तेरा वर्षांखालील खालील गटात प्रियांशू साळवे (रौप्य), सिद्धार्थ वराडे (कांस्य) तर तेरा वर्षांखालील मुलींमध्ये अनन्या वंदेकर (सुवर्ण), ईश्वरी माळी (कांस्य), पंधरा वर्षांखालील मुलामध्ये ओम मुरकुटे (कांस्य) आणि मुलीमध्ये संजना पी (रौप्य) व सिद्धी ढोरे (कांस्य) पदक पटकावले आहे. यावर्षी प्रथमच आठ वर्षांखालील मुलांसाठी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये सिद्धांत मांडगे (सुवर्ण), रियांश खानखोजे (रौप्य), शौर्य इंगलकर (कांस्य) यांचीही कौतुकास्पद कामगिरी झाली.

आंतरराष्ट्रीय पातळीवर आईस स्केटिंगसाठी कार्यरत असणाऱ्या पुण्यातील स्नोव्हीट क्लबचे डॉ. विपुल लुनावत व सुबोध पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व मुले सराव करत आहेत. हे स्पर्धक पुण्यातील कर्नाटक हायस्कूलमधील शाळेच्या पटांगणावर तसेच औंधमधील एस. के. पी. शाळेवर दररोज, तर मुंबईमधील एस्सेल वर्ल्ड आईस रिंकवर सराव करतात. भारतीय आईस स्केटिंग असोसिएशनतर्फे सुवर्णपदक विजेत्यांना रोख रुपये पाच हजार व पदक देण्यात आले. डिसेंबर २०१९ मध्ये मलेशिया येथे होणाऱ्या प्रशिक्षण शिबिरासाठी या स्केटर्सची निवड करण्यात आली आहे. चार वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते आणि दक्षिण कोरियाचे प्रशिक्षक चुन ली क्युंग हे प्रशिक्षण घेणार आहे.

सोळाव्या राष्ट्रीय आईस स्केटिंग स्पर्धेतील विजेता महाराष्ट्राचा संघ.

दृष्टिक्षेपात



राष्ट्रीय स्पीड स्केटिंग स्पर्धेत पदक जिंकलेले खेळाडू.

# आइस स्केटिंग स्पर्धेत पुण्याला चौदा पदके

**पुणे :** राष्ट्रीय आइस स्केटिंग स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंनी १४ पदके मिळविली. गुरुग्राममध्ये ७५ मीटर अंतराच्या रिंकवर १५ वर्षांखालील गटाची शर्यत ५००, तर इतर गटांच्या ३०० मीटरच्या शर्यती झाल्या. दहा वर्षांखालील गटात आरव पटवर्धनने सुवर्ण, ओजस कुलकर्णीने रौप्य, अद्वय कोठारीने ब्राँझ, मुलींमध्ये स्वरूपा कड-देशमुखने सुवर्ण, तेरा वर्षांखालील गटात प्रियांशू साळवेने रौप्य, सिद्धार्थ वराडेने ब्राँझ, १३ वर्षांखालील मुलींमध्ये अनन्या वंदेकरने सुवर्ण, ईश्वरी माळीने ब्राँझ, १५ वर्षांखालील मुलांमध्ये ओम मुरकुटेने ब्राँझ, मुलीमध्ये पी. संजनाने रौप्य व सिद्धी ढोरेने ब्राँझ मिळविले. या वर्षी प्रथमच आठ वर्षांखालील मुलांसाठी झालेल्या शर्यतीत सिद्धांत मांडगेने सुवर्ण, रियांश खानखोजेने रौप्य, तर शौर्य इंगलकरने ब्राँझ मिळविले. पुण्यातील स्नोव्हीट क्लबचे डॉ. विपुल लुणावत व सुबोध पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे खेळाडू सराव करतात. कर्नाटक हायस्कूल, औंधमधील एस. के. पी. शाळेत रोज, तसेच मुंबईमधील एस्सेल वर्ल्ड आइस रिंकवर सराव करतात. भारतीय संघटनेतर्फे पदकविजेत्यांना पाच हजार रुपये व पदक देण्यात आले

**Sakal Marathi newspaper - 15/08/2019**

## Congratulations to our young achiever - Ishwari